# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्ष 1989 मध्ये स्थापिलेले)

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 160 |
| स्थळ | : | प्रशासकीय इमारत सभागृह<br>यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ<br>नाशिक, 422 222 |
| वार व दिनांक | : | गुरूवार, दिनांक : 12 जानेवारी 2017 |
| वेळ | : | दुपारी 2.00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

## कार्यवृत्त

160 वी, व्यवस्थापन मंडळ बैठक, गुरूवार, दिनांक 12 जानेवारी 2017 रोजी दुपारी 2 वाजता, प्रशासकीय इमारत सभागृह, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.प्रा.डॉ. दिलीप म्हैसेकर, प्रभारी कुलगुरु, — अध्यक्ष
2. मा.डॉ.डब्ल्यु.एन.गाडे,कुलगुरू,पुणे — सदस्य
3. मा. डॉ. एस.ए. ठोंबरे. औरंगाबाद — सदस्य
4. मा. प्रमोद बियाणी, संचालक, शैक्षणिक सेवा विभाग,यचममुवि,नाशिक — सदस्य
5. मा.प्रफुल वाकडे, सहसंचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण — सदस्य
6. मा. श्री. ज्ञानदेव नाठे, सहसंचालक,तंत्रशिक्षण,नाशिक — सदस्य
7. डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव — सचिव
8. मा.प्रभारी वित्त अधिकारी,य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य
9. मा. परीक्षा नियंत्रक, य.च.म.मुक्त विद्यापीठ,नाशिक — निमंत्रित सदस्य

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

1. मा. सचिव,उच्च व तंत्रशिक्षण,मुंबई — सदस्य
2. मा. सचिव, उद्योग, मुंबई — सदस्य
3. मा. सचिव, कृषी, मुंबई — सदस्य
4. मा.संचालक,उच्च शिक्षण,पुणे — सदस्य
5. मा.श्री.हेमंत टकले, मुंबई — सदस्य
6. मा.डॉ.बंदी व्यंकटेशवारलू,कुलगुरू,परभणी — सदस्य
7. मा. डॉ. विद्या येरावडेकर, पुणे — सदस्य
8. मा. प्रा. कपिल कुमार, नवी दिल्ली — सदस्य
9. मा.डॉ.व्ही.एल.माहेश्वरी, जळगाव — सदस्य
10. मा.श्री.उल्हास एन. गवळी, औरंगाबाद — सदस्य
11. मा. डॉ. आर.सेशा अय्यर, मुंबई — सदस्य

मा. श्री. ज्ञानदेव नाठे, सहसंचालक,तंत्रशिक्षण,नाशिक हे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सदर बैठकीस उपस्थित होते.

| विषयक्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 160.1.0 | | **स्वागत**<br>मा.कुलसचिव यांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत केले, व बैठकीस सुरवात करण्यात आली. |
| 160.2.0 | 160.2.1 | **गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना डि.लिट देण्याबाबतच्या प्रस्तावास मंजूरी देणेबाबत...** |

| | | |
|---|---|---|
| | | **टिपणी** – व्यवस्थापन परिषद सचिव डॉ.दिनेश भोंडे व विद्वत परिषद सदस्य डॉ.प्रकाश देशमुख यांनी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना डि.लिट. पदवी देऊन सन्मानित करण्यात यावे अशी विनंती पत्राद्वारे मा.कुलगुरू यांना केली. त्यानुसार मा.कुलगुरू यांनी, मा.कुलपती तथा राज्यपाल यांना पत्र पाठवून विद्यापीठाच्या **Statute No. 4 (Amendent No.1)**नुसार सदरील प्रस्तावाचा विचार करून मान्यता देण्याची विनंती केली. मा.कुलपती कार्यालयाकडून गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना डि.लिट देण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळावर ठेवण्यास मान्यता दिली.<br>गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांनी सुध्दा डि.लिट. पदवी स्वीकारण्यास संमती दिली आहे त्यामुळे सदरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर<br>व्य.मं.ठराव: गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना डि.लिट. पदवी देण्याबाबत **सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

सचिव
व्यवस्थापन मंडळ

अध्यक्ष 12/01/17
व्यवस्थापन मंडळ